ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - IX Issue - I January - March - 2020

MARATHI PART - II

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.399
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.
Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)
Cell No. : 9579260877, 9822620877, 7030308239 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.399 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD


| | |
|---|---|
| **Professor Kaiser Haq**<br>Dept. of English, University of Dhaka,<br>Dhaka 1000, Bangladesh. | **Roderick McCulloch**<br>University of the Sunshine Coast,<br>Locked Bag 4, Maroochydore DC,<br>Queensland, 4558 Australia. |
| **Dr. Ashaf Fetoh Eata**<br>College of Art's and Science<br>Salmau Bin Adbul Aziz University. KAS | **Dr. Nicholas Loannides**<br>Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor,<br>Faculty of Computing, North Campus,<br>London Metropolitan University, 166-220 Holloway Road,<br>London, N7 8DB, UK. |
| **Muhammad Mezbah-ul-Islam**<br>Ph.D. (NEHU, India) Assot. Prof. Dept. of<br>Information Science and Library Management<br>University of Dhaka, Dhaka - 1000, Bangladesh. | **Dr. Meenu Maheshwari**<br>Assit. Prof. & Former Head Dept.<br>of Commerce & Management<br>University of Kota, Kota. |
| **Dr. S. Sampath**<br>Prof. of Statistics University of Madras<br>Chennari 600005. | **Dr. D. H. Malini Srinivasa Rao**<br>M.B.A., Ph.D., FDP (IIMA)<br>Assit. Prof. Dept. of Management<br>Pondicherry University<br>Karaikal - 609605. |
| **Dr. S. K. Omanwar**<br>Professor and Head, Physics,<br>Sat Gadge Baba Amravati<br>University, Amravati. | **Dr. Rana Pratap Singh**<br>Professor & Dean, School for Environmental<br>Sciences, Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar<br>University Raebareily Road, Lucknow. |
| **Dr. Shekhar Gungurwar**<br>Hindi Dept. Vasantrao Naik<br>Mahavidyalaya Vasarni, Nanded. | **Memon Sohel Md Yusuf**<br>Dept. of Commerece, Nirzwa College<br>of Technology, Nizwa Oman. |
| **Dr. S. Karunanidhi**<br>Professor & Head,<br>Dept. of Psychology,<br>University of Madras. | **Prof. Joyanta Borbora**<br>Head Dept. of Sociology,<br>University, Dibrugarh. |
| **Dr. Walmik Sarwade**<br>HOD Dept. of Commerce<br>Dr. Babasaheb Ambedkar Marathwada<br>University, Aurangabad. | **Dr. Manoj Dixit**<br>Professor and Head,<br>Department of Public Administration Director,<br>Institute of Tourism Studies,<br>Lucknow University, Lucknow. |
| **Prof. P. T. Srinivasan**<br>Professor and Head,<br>Dept. of Management Studies,<br>University of Madras, Chennai. | **Dr. P. Vitthal**<br>School of Language and Literature<br>Marathi Dept. Swami Ramanand<br>Teerth Marathwada University, Nanded. |

# EDITORIAL BOARD

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Sadique Razaque**
Univ. Department of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Prof. Ram Nandan Singh**
Dept. of Buddhist Studies University of Jammu.

**Dr. Safiqur Rahman**
Assistant Professor, Dept. of Geography,
Guwahati College Bamunimaidam, Guwahati,
Assam.

PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मानवमुक्तिची कविता<br>**प्रा. डॉ. दत्ता रुस्तुमराव शिंदे** | १-६ |
| २ | उपभोग प्रवत्तीच्यासिद्धाचे विश्लेषणात्मक अभ्यास<br>**प्रा. बोगुलवार ए. एच.** | ७-१० |
| ३ | संयुक्त महाराष्ट्र चळवळीत शाहीर कॉम्रेड अमर शेख यांचे योगदान<br>**डॉ. अतुल अ. ओहाळ** | ११-१४ |
| ४ | संत तुकारामांच्या अभंगातील भक्तिचे स्वरुप<br>**प्रा. सुधीर गरड** | १५-१९ |
| ५ | राजकीय संस्था आणि कार्यपद्धती<br>**प्रा. कल्पना एस. गोडघाटे** | २०-२५ |
| ६ | भारतीय राजकारणात स्त्रियांची स्थिती<br>**प्रा. डॉ. रायन महाजन** | २६-३० |
| ७ | भारतीय अर्थव्यवस्थेत उद्योगांची भूमिका<br>**प्रा. अजय वि. तगलपल्लेवार** | ३१-३७ |
| ८ | कौटुंबिक सामाजिक व आरोग्यविषयक समस्यांबाबत ग्रामिण भागातील महिलांचे अध्ययन<br>विशेष संदर्भ - वर्धा जिल्हा<br>**डॉ. माधुरी झाडे** | ३८-४३ |
| ९ | संत चोखामेळा यांच्या अभंगातील सामाजिक विद्रोह<br>**प्रा. डॉ. कालिदास गुडदे** | ४४-४७ |
| १० | समकालीन भारतीय समाज आणि माध्यमांची भूमिका<br>**डॉ. संजय नी. पाटील** | ४५-५२ |
| ११ | नव्वादोत्तरी काळातील बदलत्या शहरीकरणाची संकल्पना व स्वरूप<br>**प्रविणकुमार डाळिंबकर** | ५३-५७ |

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | आदिवासी साहित्यातील स्त्रीजीवन<br>**श्री केशव धोंडिबा टिपरसे** | ५८-६४ |
| १३ | सीमाभागातील विद्यापीठाच्या परीक्षेत्राची सद्य:स्थिती (संदर्भ : देगलूर - उदगीर परिसर)<br>**डॉ. विठ्ठल जंबाले** | ६५-६९ |
| १४ | ग्रंथालय : सण व उत्सवांच्या माहितीचा खजिना<br>**डॉ. घ. ना. पांचाळ** | ७०-७३ |
| १५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बौद्ध 'धम्म'<br>**डॉ. प्रियराज महेशकर** | ७४-७७ |
| १६ | विंदा : मराठी कवितेच्या परंपरेतील वेगळेपण<br>**प्रा. डॉ. अशोक नामदेव पळवेकर** | ७८-८२ |
| १७ | चर्मकार समाजातील शैक्षणिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>(विशेष संदर्भ : अमरावती तालुका)<br>**प्रा. डॉ. सुभाष के. पवार** | ८३-८६ |
| १८ | ग्रामीण समाजातील बलुतेदारी पद्धतीच्या परिवर्तनाच्या कारणांचा अभ्यास<br>**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव** | ८७-९० |
| १९ | अरुणा सबाने यांची कादंबरी : एक आकलन<br>**डॉ. पद्मारेखा धनकर** | ९१-९४ |
| २० | 'कोविड - १९' तू मानसाला जगणे शिकवून गेलास !!<br>**प्रा. डॉ. आनंद के. भोयर** | ९५-१०० |
| २१ | लातूर जिल्ह्यातील जैन शिल्पावशेष<br>**प्रा. डॉ. सुनिल रामचंद्र पुरी** | १०१-१०८ |
| २२ | नौकरी करणाऱ्या आणि नौकरी न करणाऱ्या गृहिणींच्या क्रयव्यवहारावर जाहिरातीचा परिणाम<br>**अफसाना सत्तार शेख** | १०९-११५ |

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २३ | स्वामी रामानंद तीर्थ महाठवाडा विद्यापीठास मानव्य विद्याशाखे अंतर्गत सादरइतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, लोकप्रशासन पीएच.डी.प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण<br>**प्रा. दत्तराम रामजी रगडे**<br>**डॉ. घ. ना. पांचाळ** | ११६-१२३ |
| २४ | अनिलांची सामाजिक व वैचारिक कविता<br>**डॉ. सुदर्शन दिवसे** | १२४-१३३ |
| २५ | किशोरावस्थेतील व्यक्तीमत्व विकास<br>**प्रा. डॉ. सौ. उषा एम. खंडाळे** | १३४-१३९ |
| २६ | कोरोना संकट आपत्ती व्यवस्थापन : जागतिक हवामान बलवावर होणारे संभाव्य सकारात्मक परिणाम<br>**जयमंगल धनराज** | १४०-१४७ |
| २७ | सुजान पालकत्व<br>**डॉ. सुनिता भोईकर** | १४८-१५४ |

VOLUME - IX, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2020
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)**

# १८. ग्रामीण समाजातील बलुतेदारी पद्धतीच्या परिवर्तनाच्या कारणांचा अभ्यास

**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव**
समाजशास्त्र विभाग, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वातत्त).

**प्रस्तावना**

ग्रामीण समाजाचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. शेतीवर उदरनिर्वाह करणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून या बलुतेदारी व्यवस्थेला मानले जाते. ग्रामीण समुदाय हा स्वावलंबी होता, त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ग्रामीण समुदायातील बलुतेदारी व्यवस्था हे होते. ग्रामीण समाजात व्यवसायाची विभागणी ही जातीच्या आधारे करण्यात आली होती. बलुतेदारी व्यवस्था ही एकमेकांच्या सहकार्यावर चालत असे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारी अवजारे तयार करण्याचे काम प्रत्येक वेगवेगळ्या जातीला देण्यात आले होते. ज्या जातीकडे शेती नव्हती त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय म्हणून ही बलुतेदारी व्यवस्था अस्तित्वात आली व त्यांना देण्यात येणाऱ्या मोबदल्यात ते शेतकऱ्यांना आवश्यक असणारे शेतीची अवजारे पुरवत असत. ही व्यवस्था शेतकरी आणि बलुतेदार यांच्यात एकप्रकारे सहकार्याची भावना निर्माण करणारी होती. या व्यवस्थेमुळे गावातील लोकांना शहरात जाण्याची गरज नव्हती. गावातच त्यांना शेतीसाठी आवश्यक साहित्य मिळत असल्यामुळे गावाचे परालंबीत्व कमी झाले होते व गावे स्वयंपूर्ण बनली होती.

**व्याख्या**

1. ऑस्कर लेवीस :– "या व्यवस्थेत गावातील प्रत्येक जातीने दुसऱ्या जातीतील कुटूंबासाठी प्रमाणभूत स्वरूपाच्या सेवा प्रदान कराव्यात अशी अपेक्षा केली जाते."

**सं□ोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय तथ्य संकलनाचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रमुख्याने संदर्भ–ग्रंथ, इंटरनेट, वर्तमानपत्र, मासिके इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**उद्दिश्ट्ये**

1. बलुता पद्धतीच्या ऱ्हासाची कारणे जाणून घेणे.
2. औद्योगिकरणाचा बलुता पद्धतीवरील परिणाम अभ्यासणे.
3. जाती–व्यवस्थेचा आणि बलुता पद्धतीतील संबंध अभ्यासणे.

**गृहितके**

1. आजही ग्रामीण समाजात बलुता पद्धतीचे अस्तित्व जाणवते.
2. लोकांच्या मानसिकतेत बदल झाल्याने बलुता पद्धतीत परिवर्तन झाले.

**बलुतेदारी पद्धतीतील परिवर्तनाची कारणे**

ग्रामीण समुदायात 12 बलुतेदार व 18 अलुतेदार होते. त्याच्यामुळे ग्रामीण समाजातील लोकांच्या गरजा ग्रामीण भागातच पूर्ण केल्या जात होत्या. पण काळाच्या ओघात ग्रामीण भागात खूप मोठे बदल होत गेले. एकंदरीत देशात मोठ्या प्रमाणात परिवर्तन झाले. त्याचा परिणाम ग्रामीण बलुतेदारी व्यवस्थेवर झाला. अशी कोणती कारणे आहेत ज्यामुळे ग्रामीण बलुतेदारी व्यवस्थेचा ऱ्हास झाला.

बलुतेदारी पद्धतीमुळे आर्थिक स्वयंपूर्णता, सामाजिक ऐक्य, व्यवसाय निश्चिती, व्यवसायिक शिक्षणाच्या सोयी, आर्थिक व सामाजिक संरक्षण प्राप्त झाले होते. पण खालील कारणामुळे ग्रामीण बलुतेदारी व्यवस्थेत परिवर्तन झाले.

**कारणे**

**औद्योगिकरण**

स्वातंत्र्यापूर्वी सुरू झालेली औद्योगिकरणाची गती भारत स्वातंत्र्य झाल्यानंतर वाढत गेली. मोठ्या प्रमाणात मोठ–मोठ्या उद्योगधंद्यांची वाढ झाली. त्या उद्योगात लागणाऱ्या कामगारांची भरती जातीवर न करता गुण–कौशल्यावर करण्यात येऊ लागली. त्यामुळे बलुतेदारांची मुले उद्योगधंद्यात कामगार म्हणून भरती होऊ लागली. त्यामुळे बलुतेदारी व्यवस्थेचा ऱ्हास झाला.

**नागरीकरण**

औद्योगिकरणामुळे नागरीकरणाचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढले. शहरे शिक्षण, उद्योग, व्यापार, व्यवसायाची केंद्र बनली. शहरात बँक, बाजारपेठा, शिक्षण संस्था, शासकीय, निमशासकीय कार्यालये इत्यादी मोठ्या प्रमाणात निघाली. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या. वेतन, मान–सन्मान, प्रतिष्ठा, सोयी–सुविधा शहरात मिळू लागल्याने ग्रामीण बलुतेदारांना शहराचे आकर्षण निर्माण झाले. तसेच ग्रामीण लोक शहराकडे स्थलांतरित होऊ लागले. नागरीकरण होत असल्याने ग्रामीण भाग ओस पडू लागला. त्यामुळे पण बलुतेदारी व्यवस्थेचा ऱ्हास झाला.

**दळण–वळण व्यवस्था**

ग्रामीण भागात पूर्वी दळण–वळणाच्या साधनांचा अभाव होता. म्हणून शहरात जायचे म्हटले तर चालत जावावे लागत असे. पण स्वातंत्र्यानंतर ग्रामीण भागात रस्ते, दळण–वळण साधने, वाहने मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे अवजारे शहरातून घेता येऊ लागल्याने मोठ्या प्रमाणात बलुतेदार बेकार बनले. तसेच नवीन मूल्ये, नवीन विचार यामुळे पण बलुतेदार आपला पारंपरिक व्यवसाय शहरात करू लागले. त्यामुळे पण ग्रामीण समाजातील बलुतेदारी व्यवस्थेचा ऱ्हास झाला.

**शिक्षण**

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचे दरवाजे सर्वांनाच खुले झाले. धर्म, जात असा भेदभाव न करता सर्वांना शिक्षण मिळू लागल्याने बलुतेदारांची मुले शिक्षण घेऊ लागली. शिक्षणामुळे समता, स्वातंत्र्य, न्याय, मानवता यासारख्या मूल्यांची जाणीव झाली. त्यामुळे बलुतेदारांना गुलामगिरीचे जीवन जगण्यापेक्षा रोख पैसा घेऊन स्वाभिमानाने जगावे वाटू लागले. बलुतेदाराच्या जातीने शिक्षणावर भर दिल्यामुळे व नोकरी, व्यवसाय, उद्योगात गुंतल्यामुळे बलुतेदारी व्यवस्थेचा ऱ्हास झाला.

**कुटुंबातील वाढती लोकसंख्या**

भारतात लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत गेली आणि या वाढत्या लोकसंख्येचा भार शेती व्यवसायावर पडत गेल्याने सर्वांना रोजगार मिळेलच याची शाश्वती राहिली नाही. त्यामुळे लोक गाव सोडून आपला पारंपरिक बलुतेदारीचा व्यवसाय सोडून रोजगारासाठी लोक शहराकडे स्थलांतरित होऊ लागले. कुटुंबाचा वाढता आकार, कुटूंब सर्वांच्या गरजा पूर्ण करण्यास असमर्थ ठरू लागले. त्यामुळे बलुतेदार रोजगारासाठी गाव सोडून शहराकडे जाऊ लागले. शहरात रोख मोबदला मिळत असल्याने गावातील बलुतेदार शहरात स्थायी होऊ लागले.

**लोक□ाहीचा स्वीकार**

पूर्वी जातीव्यवस्थेचा प्रभाव ग्रामीण समाजावर खूप होता आणि बलुतेदारी व्यवस्था ही जातीवरच आधारित होती. पण जातीचे महत्त्व दिवसें–दिवस कमी होऊ लागले. त्यामुळे जातीचा जो दंडक होता की, प्रत्येक जातीने आपला निश्चित केलेला व्यवसाय करावा पण स्वातंत्र्यानंतर लोकशाहीचे महत्त्व वाढले व लोकांनापण व्यवसाय स्वातंत्र्य मिळाल्याने लोक बलुतेदारीपासून दूर गेले.

**मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव**

बदलत्या काळानुसार मुद्राप्रधान अर्थव्यवस्थेचा प्रभाव वाढत आहे. उत्पादित माल बाजारपेठेत विकून जास्तीत–जास्त नफा मिळविणे हे या अर्थव्यवस्थेचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बलुतेदारी करणारे कुटुंबातील लोकांनी शहरात आपल्या पारंपरिक व्यवसायाची वेगळी ओळख निर्माण केली. त्यात न्हावीने शहरात हेअर सलूनचे दुकान टाकले. चांभाराने चप्पलांचे नव–नवीन शोरूम शहरात काढले. अशाप्रकारे जास्तीत–जास्त रोख स्वरूपात पैसा कमवू लागले. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. पण ग्रामीण समाजातील बलुतेदारी व्यवस्था मोडकळीस आली. सेवेच्या व वस्तू विनिमयाच्या ऐवजी मुद्रेचे महत्त्व वाढले.

**निश्कर्श**

प्राचीन काळात खेडी दळणवळणाच्या अभावामुळे इतर जगापासून पूर्णतः तुटलेली होती. त्यामुळे आर्थिक स्वयंपूर्णता ही त्या काळाची गरज होती. बलुतेदारी पद्धतीने ही गरज पूर्ण केली. बदलत्या काळानुसार बलुतेदारी व्यवस्थेत परिवर्तन झाले. औद्योगिकरण, शिक्षणाचा प्रसार, व्यक्तीनिष्ठ प्रवृत्तीत वाढ यामुळे सामुदायिक जीवनास तडे गेले. स्वतःच्या विकासासाठी लोक जातीपेक्षा व्यक्तीगत विकासावर भर देऊ लागले. औद्योगिकरणामुळे शहरात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. त्यामुळे लोक ग्रामीण भागात आपल्या कुटुंबाचा पारंपरिक व्यवसाय करण्यापेक्षा एखादी नोकरी शहरात जाऊन करावी व रोख स्वरूपात पैसा मिळवावा या गोष्टीला महत्त्व प्राप्त झाले. कनिष्ठ जातीतील लोक आज गुलामासारखे कोणाकडे नोकरी करत नाहीत. त्यांच्यात जागृती झाली आहे. भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य, समता, बंधुत्व व न्याय या आधुनिक मूल्यांचा स्वीकार केला. विषमता नष्ट करणारे अनेक कायदे करण्यात आले. त्यामुळे जातीच्या आधारावर प्रतिष्ठा प्राप्त न होता व्यक्तीच्या कर्तृत्वाला महत्त्व प्राप्त झाले. ग्रामीण लोकपण आपल्या मुलाला चांगले शिक्षण देऊ लागले व मुले आपल्या बौद्धिक क्षमतेच्या आधारावर नव–नवीन व्यवसायाचा स्वीकार करू लागले.

**संदर्भ–सूची**

1. जी. आर. मदन – भारत का ग्रामीण पुर्ननिर्माण – विवेक प्रकाशन, दिल्ली.
2. दुबे सरला – भारत में सामाजिक परिवर्तन – सरस्वती सदर, दिल्ली
3. आर. एन. मुखर्जी – भारतीय ग्रामीण समाजशास्त्र – प्रकाश बुक डेपो, बरेली.
4. डॉ. ए. आर. देसाई – भारतीय ग्रामीण समाजशास्त्र – रावत पब्लिकेशन, नवी दिल्ली.
5. जी. आर. मदन – भारत का ग्रामीण पुर्ननिर्माण – विवेक प्रकाशन, दिल्ली.
6. सुबहसिंग यादव –ग्रामीण विकास के नये क्षितीजे, मानव पब्लिकेशन, दिल्ली.
7. इंटरनेट.
8. वर्तमानपत्र.